गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष १ ले ● अंक २९३ वा ● गुरुवार १४ मार्च २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 293 | Date : 14/03/2024 blow Thursday Page 4 Price 4

## भाजप उमेदवारांची दुसरी यादी जाहीर, ११ राज्यातील ७४ नावांची घोषणा



नवी दिल्ली : निवडणूक आयोग लवकरच देशातल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तारखा जाहीर करू शकतो. या पार्श्र्वभूमीवर देशभरातील विविध राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. वेगवेगळे पक्ष त्यांच्या लोकसभा उमेदवारांच्या याद्या जाहीर करू लागले आहेत. गेल्या आठवड्यात भारतीय जनता पार्टीने त्यांच्या लोकसभा उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली होती. याद्वारे भाजपाने १९५ उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. त्यापाठोपाठ भाजपाने आता त्यांची दुसरी यादी जाहीर केली आहे. भाजपाने पहिल्या यादीत महाराष्ट्राच्या एकाही उमेदवाराचं नाव जाहीर केलं नव्हतं. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेला भाजपाच्या उमेदवारांची नावं जाणून घेण्याची उत्सुकता होती. अशातच भाजपाने आज त्यांच्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे.

भाजपाने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या यादीनुसार हिना गावित यांना नंदुरबार, सुभाष भामरे–धुळे, स्मिता वाघ – जळगाव, रक्षा खडसे – रावेर, अनुप धोत्रे – अकोला, रामदास तडस – वर्धा, नितीन गडकरी – नागपूर, सुधीर मुनगंटीवार । पान २ वर

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 'पीएम–सुरज पोर्टल'चे लोकार्पण

मुंबई : वंचित व मागास घटकांचा विकास झाल्याशिवाय देश विकसित होणार नाही. त्यामुळे देशातील वंचित आणि मागास घटकांच्या विकासावर केंद्र सरकार भर देत




असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितले. देशातील वंचित व मागासवर्गातील जनतेच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या पीएम–सुरज पोर्टलचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. याअनुषंगाने मुंबईत आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान नमस्ते योजनेंतर्गत सफाई कामगारांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पीपीई–किटचे वाटप करण्यात आले. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य विकास उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, खासदार राहुल शेवाळे, आमदार भरत गोगावले, सामाजिक न्याय विभागाचे सचिव सुमंत भांगे, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. अमोल शिंदे आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री विरेंद्र सिंह यांच्यासह विविध राज्यातील लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पीएम–सुरजच्या । पान २ वर

## ...अखेर फडणवीस यांनी मंगळवेढेकरांना दिलेला शब्द पाळला

### बहुचर्चित मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मंजुरी; आ.समाधान आवताडेंच्या प्रयत्नांना यश




मंगळवेढा/प्रतिनिधीः पोट निवडणुकीमध्ये पंढरपूर मतदारसंघामधून समाधान आवताडे यांना निवडून द्या महाविकास आघाडी सरकारचा करेक्ट कार्यक्रम करून मी मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मंजुरी देतो असा शब्द तत्कालीन विरोधी पक्षनेते तथा सध्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवेढा येथील सभेत मंगळवेढेकरांना दिला होता त्या शब्दावर विश्र्वास ठेवून मंगळवेढेकरांनी समाधान आवताडे यांना आमदार केले त्यानंतर देवेंद्र फडणीस यांनी सरकारचा करेक्ट कार्यक्रम ही केला आणि अवताडे यांच्या मंगळवेढा उपसा सिंचन योजनेच्या पाठपुराव्याची दखल घेत बुधवार १३ मार्च २०२४ च्या झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या योजनेस मंजुरी देऊन मंगळेकरांना दिलेला शब्दही फडणवीस सरकारने पूर्ण केल्याने मंगळवेढा तालुक्यातून पेढे वाटून या निर्णयाचे स्वागत करण्यात आले.

मंगळवेढा उपसा सिंचन योजनेमध्ये लक्ष्मी दहिवडी, आंधळगाव,शेलेवाडी,लेंडवे चिंचाळे, खुपसंगी,नंदेश्र्वर,गोणेवाडी, जुनोनी, खडकी, पाटखळ, मेटकरवाडी, भोसे,रड्डे, सिद्धनकेरी, निंबोणी,जित्ती,खवे,यड्राव, शिरशी, भाळवणी, जालिहाळ,हाजापूर । पान २ वर

## बेरोजगार उमेदवारांसाठी आज रोजगार मेळाव्याचे आयोजन

सोलापूर/प्रतिनिधीः जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर यांचे मार्फत दिनांक १४ मार्च २०२४ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय ऑनलाईन रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील नोकरीइच्छुक उमेदवारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टिने सदर ऑनलाईन रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला असल्याची माहिती कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकताचे सहायक आयुक्त ह.श्री. नलावडे यांनी दिली . या रोजगार मेळाव्यात १० वी, १२ वी, ट्रेनी, आय.टी.आय. बी.कॉम अशा प्रकारची एकुण १६० पेक्षा जास्त रिक्तपदे ४ उद्योजकांनी अधिसुचीत केलेली आहेत. । पान २ वर

## कै.कल्याणराव इंगळे तंत्रनिकेतनमध्ये आरोग्य शिबीर

अक्कलकोट/प्रतिनिधीः येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे मा.चेअरमन कै.कल्याणराव इंगळेंच्या पुण्यस्मरणानिमीत्त सोमवार दि. १८ मार्च रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत जगप्रसिद्ध नाडीतज्ञ डॉ.के.बासू व सपना बासू यांचे सर्व आजारावर आरोग्य शिबिर आयोजीत करण्यात आले आहे. हा शिबीर श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान संचलीत मैंदर्गी–गाणगापूर रोडवरील कै. कल्याणराव इंगळे महाविद्यालयात संपन्न होईल. या शिबीरात सर्व आजारांवर अचूक निदान करून गुणकारी उपचार सेवा होणार आहे, तरी गरजू रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन मंदीर समितीचे व तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे चेअरमन महेश इंगळे यांनी केले आहे.

## सीएनजी व एलपीजी इंधनावर चालणाऱ्या ऑटोरिक्षाकरिता सुधारित वयोमर्यादा लागू

सोलापूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे निर्णयानुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण सोलापूर यांचे कार्यक्षेत्राकरिता निश्र्चीत करण्यात आलेल्या वयोमर्यादेत सीएनजी व एलपीजी इंधनावर चालणा–या ऑटोरिक्षाकरिता सुधारित वयोमर्यादा लागू करण्यात येत आहे. जे परवानाधारक पेट्रोल ऑटोरिक्षा दिनांक १ ऑगस्ट २०२४ पर्यंत १५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी एलपीजी इंधनावर रुपांतरीत करून घेतील अशा रिक्षा मुळ नोंदणी दिनांकापासून २० वर्षे पूर्ण झाल्यानंतर परवान्यावरुन उतरविण्यात येतील. तसेच जे परवानाधारक पेट्रोल ऑटोरिक्षा दिनांक १ ऑगस्ट २०२४ पर्यंत १५ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी सीएनजी इंधनावर रुपांतरीत करून घेतील अशा रिक्षा मुळ नोंदणी दिनांकापासून २५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर परवान्यावरुन उतरविण्यात येतील.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, सोलापूर यांचे कार्यक्षेत्राकरिता सदरचा निर्णय दिनांक १३ फेब्रुवारी २०२४ पासून लागू राहील. असे प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचे सदस्य सचिव तथा तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी सोलापूर यांनी कळविले आहे.

## आरोग्याच्या सुविधा चांगल्या व दर्जेदार मिळाव्यात यासाठी आरोग्य विभाग सक्षम : आरोग्य मंत्री सावंत

### महिला व नवजात शिशू रूग्णालय आणि जिल्हा रूग्णालय नूतन इमातीचा लोकार्पण



सोलापूर/प्रतिनिधीः सर्वसामान्य जनतेला दर्जेदार व चांगल्या आरोग्य सेवा मिळाव्यात यास शासनाने प्राधान्य दिले आहे. आरोग्य सुविधांसाठी आवश्यक तो निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येत असून, नागरिकांना आरोग्यविषयक सोयी सुविधा तात्काळ व दर्जेदार मिळाव्यात यासाठी आरोग्य विभाग सक्षम असल्याचे प्रतिपादन आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांनी केले.

महिला व नवजात शिशू रूग्णालय आणि जिल्हा रूग्णालय सोलापूर या नूतन इमातीचा लोकार्पण तसेच १४ वा वित्त आयोग अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या १६ रुग्णवाहिकांचे, अक्कलकोट येथील ड्रामा युनिट व ग्रामीण रुग्णालय वळसंग तालुका दक्षिण सोलापूर या आरोग्य संस्थेचे लोकार्पण आरोग्यमंत्री डॉ.तानाजी सावंत यांच्या हस्ते व्हीसीद्वारे करण्यात आले.

यावेळी खासदार डॉ. जय सिद्धेश्र्वर महास्वामी, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, आरोग्य सेवा पुणे मंडळाचे उपसंचालक राधाकिशन पवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सदानंद भिसे, उपमुख्य कार्यकारी । पान २ वर

## राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाचा दिलासा

मुंबई : राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेतील मंजूर समकक्ष पदांवर सामावून घेण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. मंत्रिमंडळाच्या निर्णयामुळे राज्यातील हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे, अशी माहिती आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिली आहे.

कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्यासाठी आरोग्य मंत्री डॉ. सावंत यांनी सातत्याने पाठपुरावा केला. विविध पातळ्यांवर बैठका घेवून संबंधितांना याबाबत तातडीने कार्यवाही करण्यासाठी निर्देश दिले. तसेच याबाबत नियमित आढावाही घेतला.या निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी वयाची अट शिथिल करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य विभागातील नियमित पदांकरिताचे सेवाप्रवेश नियमांमध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन कंत्राटी कर्मचाऱ्यांचे आरोग्य सेवेतील मंजूर समकक्ष पदांवर रिक्त पदांच्या ३० टक्के प्रमाणात समायोजन केले जाणार आहे. तर ७० टक्के पदे सरळसेवेने भरण्यात येणार आहेत.या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे सेवा समावेश केल्यानंतर त्यांचे वेतन त्यांना लगतच्या मागील महिन्यामध्ये प्राप्त होणाऱ्या मानधना । पान २ वर

## सोलापुर लोकसभेसाठी राजा भाऊ सरवदेना उमेदवार द्या : राजु भगळे



दुधानी/प्रतिनिधी : सध्या देशात लोकसभेचे बिगुल वाजले असून सर्वत्र लोकसभेचे चर्चा रंगले आहेत त्याच अनुसंगाने अक्कलकोट तालुक्यातील सलगर जल्हा परिषद गटामध्ये राजू भगळे यांनी जनतेच मनातील उमेवार या विषय घेऊन गल्ली बोळात,वाड्या वस्त्यात व युवक वर्गात चर्चा केली असता, या निवडणुकीत महायुतीकडून इच्छुक उमेदवार अमर साबळे,राम सातपुते,व राजाभाऊ सरवदे यांचे नाव आघाडीवर आहे तर महाआघाडी कडून प्रणिती शिंदे यांचे नावा चर्चेत आहेत या विषयी लोकांना विचारण्यात आला की आपला कोण उमेदवार पसंदी आहे, या विषयी । पान २ वर

## मुंबादेवी, महालक्ष्मी मंदिर परिसर विकासासाठी २८० कोटी; जगन्नाथ शंकरशेठ स्मारकासाठी ३५ कोटी रुपयांचा निधी



मुंबई : मुंबई शहरातील मुंबादेवी मंदिर, महालक्ष्मी मंदिर, हाजीअली दर्गा, जगन्नाथ शंकरशेठ स्मारक व भागोजी शेठ कीर स्मारकाबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यावेळी महालक्ष्मी मंदिर परिसर विकासासाठी मुंबई महापालिकेने ६० कोटी रुपयांचा निधी देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. तर मुंबादेवी मंदीर सौंदर्यीकरणासाठी २२० कोटी, जगन्नाथ शंकरशेठ स्मारकासाठी ३५ कोटी तर भागोजी शेठ कीर स्मारकासाठी २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा, असा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या आढावा बैठकीस विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, मुंबई शहरचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, खासदार राहुल शेवाळे, आमदार सदा सरवणकर, मुंबई महापालिका आयुक्त आय एस चहल, । पान २ वर

## तीसरी मुंबई उभारण्याचे काम एम.एम.आर.डी ने लवकर पूर्ण करुन तीसऱ्या मुंबईला ग्रेटर मुंबई नाव द्यावे : केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले

मूंबई : मुंबई हे जगातील तीसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. मुंबई देशाची आर्थिक राजधानी आहे.मुंबईतील जमिनीची किंमत अमेरिकेतील जमिनीपेक्षा महाग आहे. मुंबई गर्दी आणि झोपडपट्टायांनी व्यापलेली आहे.एम.एम.आर.डी. च्या माध्यमातुन शासन मुंबईची गर्दी कमी करण्यासाठी उरण आणि उलवे या भागातील ३३५ किलोमिटरच्या परिससरात तीसरी मुंबई उभारत आहे.त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गृह प्रकल्प उभारावेत.शिवडी–न्हावा शेवा ब्रिज प्रमाणे मुलुंड ऐरोली मार्गे उरण उलवे ला जोडणारा आणखी एक नवा ब्रिज जोडावा.मुंबई–नविमुंबई आणि आता तीसरी मुंबई उभारण्याचे काम लवकर पूर्ण करावे.दिल्लीत नोएडा आणि ग्रेटर नोएडा



अशी नावे शहरांना दिली आहेत.त्यानुसार तीस ऱ्या मुंबईला ग्रेटर मुंबई नाव द्यावे अशी सुचना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली. मुंबई च्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळील नंदगीरी अतिथी गृहा जवळ पश्र्चिम दृतगती महामार्गवर टेक वन या एम.एम.आर.डी. ने उभारलेल्या नविन पुलाचे लोकार्पण केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या हस्ते झाले.त्यावेळी ते बोलत होते,यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा,खासदार पुनम महाजन,आमदार पराग आळवनी, एम.एम.आर.डी.चे महानगर आयुक्त डॉ.संजय मुखर्जी आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबई विमानतळाशेजारी हजारो झोपडया आहेत.विमानतळ परिसर झोपड्यांनी व्यापला आहे.मागील ४० वर्षापेक्षा अधिक काळापासून या झोपड्या आहेत.या झोपडपट्टयांचा विकास । पान २ वर

# संपादकीय

## समझोता होऊ शकतो...

ओरिसामध्ये वर्षानुवर्षे सत्तेवर असलेला बिजू जनता दल हा पक्ष एनडीएमध्ये सामील होण्यासाठी सकारात्मक आहे. परिणामी भाजपला नवा मित्र मिळणार आहे. काँग्रेस आणि इंडिया या विरोधी पक्षांच्या आघाडीत जाण्याऐवजी भाजपप्रणीत एनडीएमध्ये जाणे अधिक चांगले असा विचार बिजू जनता दलाचे सर्वेसर्वा नवीन पटनाईक यांनी केला असावा. नवीन पटनाईक हे ओरिसाचे मुख्यमंत्री असून काँग्रेस व भाजपपासून ते अनेक वर्षे अंतर ठेवून होते. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांचा पक्ष एनडीएमध्ये मित्रपक्ष म्हणून सहभागी होता. आता पंधरा वर्षांनंतर पुन्हा एकदा बिजू जनता दलाची वाटचाल एनडीएच्या दिशेने सुरू होत आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. मुख्यमंत्री पटनाईक यांच्या भुवनेश्वरमधील निवासस्थानी लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी झालेल्या पक्षाच्या बैठकीतच एनडीएमध्ये सामील होण्याचा निर्णय घेण्यात आला. बिजू जनता दल व भाजप यांची गेले काही दिवस चर्चा सुरू आहे. जागा वाटपाबाबत चर्चा अंतिम टप्प्यात आहेत. बिजू जनता दलाचा कल एनडीएकडे झुकण्याचा आहे हे आता स्पष्ट झाले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षांत देशाने केलेली प्रगती तसेच मोदींचा सर्व देशभर असलेला करिष्मा यामुळे बिजू जनता दलाने भाजपच्या विरोधात निवडणुका लढविण्याऐवजी भाजपसोबत निवडणूक लढवावी, असा निर्णय घेतला आहे. मोदींचे नेतृत्व हे लोकप्रियतेच्या उत्तुंग शिखरावर आहे. त्यांच्या नेतृत्वाला आव्हान देणारे कोणी नाही, हे वास्तव आहे. बिजू जनता दलाचे राज्यसभेत नऊ खासदार आहेत, हा पक्ष एनडीएमध्ये सामील झाल्यावर राज्यसभेतही एनडीएचे संख्याबळ वाढणार आहे. भाजपच्या अबकी बार चारसो पार या घोषणेला पटनाईक यांच्या निर्णयामुळे व बिजू जनता दल एनडीएमध्ये सामील झाल्यामुळे मोठे बळ प्राप्त होणार आहे. १९९८ मध्ये भाजप व बिजू जनता दल युती होती. २००९ मध्ये ती तुटली. दोन्ही पक्षांनी १९९४, १९९९ आणि २००४ अशा लोकसभा निवडणुका एकत्रपणे लढवल्या. शिवाय २००० व २००४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकाही दोन्ही पक्ष युती करून लढले होते. खरे तर बिजू जनता दल हा एनडीएमधील विश्वासू घटक पक्ष होता. पण २००९ मध्ये जागा वाटपाच्या मुद्द्यावरून युती तुटली. ओरिसात भाजप लोकसभा निवडणुकीसाठी अधिक जागांसाठी आग्रही राहील व विधानसभा निवडणुकीत बिजू जनता दलाला अधिक जागा देईल, असा समझोता होऊ शकतो.

# समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन उन्नती साधा : विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार

पुणे : केंद्र आणि राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन लाभार्थ्यांनीआपली उन्नती साधावी, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले. राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त विकास महामंडळ आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळामार्फत दूरदृष्यप्रणालीद्वारे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या लाभार्थ्यांशी संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांच्या लाभांचे वितरण जिल्ह्यातील लाभार्थ्यांना करण्यात आले. यावेळी डॉ. पुलकुंडवार बोलत होते. कार्यक्रमाला समाज कल्याण आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, समाज कल्याण सहायक आयुक्त विशाल लोंढे, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक राम राठोड उपस्थित होते.



विभागीय आयुक्त डॉ.पुलकुंडवार म्हणाले, केंद्र आणि राज्य शासन देशातील प्रत्येक नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी, प्रत्येकाला सन्मानाने जगता यावे यासाठी विविध योजना राबविते. या योजनांचा लाभ नागरिकांनी घ्यावा. पीपीई किट वाटप केलेल्या लाभार्थ्यांनी याचा योग्यपद्धतीने उपयोग करावा आरोग्य सुरक्षित करावे अशी सूचना त्यांनी केली.

बारामती येथे भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. अशा रोजगार मेळाव्याद्वारे प्रशिक्षणाची सोय उपलब्ध झाली आहे. या प्रशिक्षणाचा तसेच उद्योगासाठी गरजेचे कौशल्य आत्मसात करुन त्याचाही उपयोग व्यवसाय वाढीसाठी करावा असे आवाहनही डॉ.पुलकुंडवार यांनी लाभार्थ्यांना केले.

श्री.बकोरिया म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये लाभ वाटप आणि संवादाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात राज्यातील ६२२ जणांना आयुष्यमान कार्डचे तसेच पीपीई किटचे वाटप करण्यात येणार आहे. यामुळे आरोग्य सेवेसाठी आणि उपचारासाठी लाभार्थ्यांना खर्च करण्याची गरज पडणार नाही. सामाजिक न्याय विभागाच्यावतीने जगातील प्रमुख २०० विद्यापीठात ७५ विद्यार्थ्यांना आणि राज्यातील प्रमुख विद्यापीठात २०० विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. या व अन्य योजनांचा लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा, त्यासाठी समाज कल्याण विभागाशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांमुळे वंचित व उपेक्षित नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा होणार आहे असे सांगून लाभांच्या मंजूरीसाठी प्रशासनातर्फे सर्व प्रकारची मदत करण्यात येईल असे सांगितले.या कार्यक्रमात प्रातिनिधिक स्वरुपात लाभार्थ्यांना लाभाचे वाटप करण्यात आले. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या आणि संत रोहिदास चर्मकार महामंडळाच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात कर्ज वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला विविध योजनांचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वेरीच्या विद्यार्थ्यांनी घेतला 'इंडियाज टीचडे: चिप्स फॉर विकसित भारत' कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचा लाभ

पंढरपूर/प्रतिनिधीः आज बुधवार (दि.१३ मार्च २०२४) रोजी सकाळी १०:३० ते दु. ०१:०० च्या दरम्यान भारताचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 'देशात ३ ठिकाणी 'सेमीकंडक्टर फॅसेलिटी' निर्माण करण्याकरिता आयोजित कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचा लाभ स्वेरीतील विद्यार्थ्यांनी घेतला. भारत सरकारच्या शिक्षा मंत्रालयातील उच्चतर शिक्षा विभागचे सचिव संजय मूर्ती यांच्या पत्रानुसार व महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्या सूचनेनुसार 'सेमीकंडक्टर मिशन' व 'सेमीकंडक्टर फॅसेलिटी'चे बळकटीकरण करण्याकरिता आयोजिलेल्या या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन स्वेरी मध्ये करण्यात आले होते. या निमित्ताने स्वेरीतील विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार वर्गात बसून तन्मयतेने ऐकले व या उपक्रमाचे स्वागत केले. स्वेरी या शिक्षण संस्थेतील चारही महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकांनी या संपूर्ण कार्यक्रमाचा लाभ घेतला. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कॉलेज ऑफ फार्मसी, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (डिप्लोमा) व डी.फार्मसीमध्ये एल.सी.डी. प्रोजेक्टर द्वारे 'इंडियाज टीचडे: चिप्स फॉर विकसित भारत' या कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपणाचे आयोजन केले गेले होते. प्रारंभी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. महेश मठपती यांनी विभागप्रमुखांना व वर्ग शिक्षकांना या कार्यक्रमाच्या आयोजनासंदर्भात माहिती दिली. प्रत्येक वर्गात आणि आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स हॉल मध्ये थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय करण्यात आली होती. पंतप्रधान मोदी यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सर्वांना संबोधित केले आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुमारे १.२५ लाख कोटी रुपयांच्या तीन सेमीकंडक्टर प्रकल्पांची पायाभरणी केली. या प्रसंगी संबोधित करताना पंतप्रधान म्हणाले की, 'हा ऐतिहासिक प्रसंग भारताच्या उज्ज्वल भविष्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे कारण गुजरातमधील धोलेरा आणि सदानंद आणि आसाममधील मोरेगाव येथे तीन मोठ्या 'सेमीकंडक्टर उत्पादन' प्रकल्पांची पायाभरणी करण्यात आली आहे. या अनोख्या कार्यक्रमाशी जवळपास ६० हजार हून अधिक महाविद्यालये, विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्था जोडल्या गेल्या आहेत.' असे सांगून भारतीय युवकांना प्रोत्साहित केले. भारत विकसित




होण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी जवळपास अर्धा तासाच्या कालावधीत महत्वपूर्ण विचार मांडले. स्वेरी संचलित अभियांत्रिकी व फार्मसीच्या प्रथम वर्षापासून ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला व महत्वाचे विचार विद्यार्थ्यांनी आपल्या वहीत नोंद करून घेतले. या थेट प्रक्षेपण कार्यक्रमाला स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, बी. फार्मसीचे प्राचार्य डॉ.मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ व डी. फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतिश मांडवे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, वर्ग शिक्षक, प्राध्यापक वर्ग व शिक्षकेतर कर्मचारी तसेच अभियांत्रिकी व फार्मसीचे पदवी, पदव्युत्तर पदवी व पदविका मधील विद्यार्थी उपस्थित होते.

पान १ वरुन

## ...अखेर फडणवीस यांनी

हिवरगाव,डोंगरगाव या गावांचा समावेश आहे या गावांना भीमा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यातून ९५ किलोमीटर मधून पोहोच कालव्याद्वारे योजनेसाठी आवश्यक २.०४ अघफु(५७.७६४ दलघमी) पाणी उचलून बंदिस्त नलिका प्रणाली द्वारे मंगळवेढा उपसा सिंचन योजनेतील २४ गावातील १७,१८६ हेक्टर दुष्काळी क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे

सन २००९ च्या लोकसभा निवडणुकीत पाणी संघर्ष समितीने ३५ गावच्या पाण्यासाठी निवडणुकीवर बहिष्कार टाकला होता त्यानंतर येथील पाणीप्रश्न चांगलाच पेटत गेला,व या योजनेबाबत अनेक तर्कवितर्क वाढविले गेले

पोटनिवडणुकीच्या प्रचारात तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पंढरपूर-मंगळेवढ्याचा आमदार भाजपचा करा; मंगळवेढा उपसा सिंचन योजनेला मंजुरी आणि गरज पडल्यास केंद्रातून पैसा उपलब्ध करतो असे सांगितले होते.आ आवताडेंनी विधिमंडळाच्या अधिवेशनातही या योजनेसंदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी उपमुख्यमंत्री फडणवीसांनी सकारात्मक भूमिका घेत हा प्रश्न लवकरच मार्गी लावू, असे उत्तर दिले होते.मात्र प्रस्तावात काही त्रुटी असल्याने त्याची पूर्तता करण्यासाठी बराच कालावधी गेला होता, बुधवार १३ मार्चच्या मंत्रिमंडळ बैठकीत या योजनेला मंजुरी देऊन आपला शब्द पाळल्याचे दाखवून दिले. या मंजुरीनंतर मंगळवेढा येथे त्या २४ गावातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मंगळवेढा येथील दामाजी पंतांच्या पुतळ्याला पुष्पहार घालून पेढे वाटले तसेच मतदारसंघातील गावोगावी फटाक्यांची आतषबाजी करीत जल्लोष करून आनंद व्यक्त केला.

## आरोग्याच्या सुविधा चांगल्या व दर्जेदार

अधिकारी ईशाधिन शेळकंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संतोष नवले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ सुहास माने, कार्यकारी अभियंता श्री ठाकरे, प्रा. शिवाजी सावंत, अमोल शिंदे, रवीना राठोड, अनिल सावंत यांच्यासह आरोग्य विभागातील आरोग्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी आरोग्यमंत्री डॉ. सावंत म्हणाले, सोलापूर शहर हे कामगारांचे शहर म्हणून ओळखले जाते. येथील सर्वसामान्य नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा तात्काळ व सहज उपलब्ध व्हाव्यात. यासाठी सुसज्ज व सर्व सुविधायुक्त १०० खांटाचे जिल्हा रुग्णालय तसेच १०० खाटांचे महिला व नवजात शिशु रुग्णालयाच्या नुतन इमारती उभारण्यात आल्या आहेत. रुग्णालयात येणाऱ्या प्रत्येक रुग्णाला आरोग्य सेवा मिळाली पाहिजे यासाठी आवश्यक आरोग्य अधिकारी व कर्मचारी तात्काळ उपलब्ध करून देण्यात येतील. आरोग्य विभागाने गेल्या दीड वर्षात विविध प्रकारचे आरोग्यअभियान राबविले आहे. राज्यातील प्रत्येक दुर्गम भागात चांगल्या पध्दतीने व २४ तास आरोग्य सुविधा उपलब्ध करु देण्यात आली. साडेबारा कोटी जनतेचे आरोग्य सुदृढ व वैचारिक दृष्ट्या चांगले हवे यासाठी मोफत उपचार सुरु केले असल्याचे आरोग्यमंत्री सावंत यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्या १४व्या वित्त आयोगाअंतर्गत १६ रुग्णवाहिका सोलापूरच्या जनतेला आरोग्य सेवा देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम क्षेत्र एकूण ९७६० चौ. मीटर असून यावर ३५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. तसेच महिला व नवजात शिशु रुग्णालयाचे बांधकाम क्षेत्र ७४५९ चौरस मीटर याचाही खर्च जवळपास ३५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असल्याचे आरोग्य मंत्री डॉ तानाजी सावंत यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा परिषदेकडे १४ वा वित्त आयोग अंतर्गत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचे बळकटीकरणासाठी ग्राम विकासाच्या आराखड्यानुसार पायाभूत सुविधा, आरोग्य शिक्षण व उपजिविका या शिर्षकाखाली रुग्णवाहिकाबाबत जि.प. सर्वसाधारण सभेत मान्यता देण्यात आली होती. जिल्हयामध्ये १६ प्राथमिक आरोग्य केंद्रास प्रत्येकी १ प्रमाणे एकूण १६ रूग्णवाहीका ग्रामपंचायत विभागाकडून खरेदी करून आरोग्य विभागास हस्तांतरीत करण्यात आल्या असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनीयावेळीदिली.

## राष्ट्रीय आरोग्य अभियानातील

एवढया नियमित वेतन श्रेणीतील पुढील टप्प्यावर निश्र्चित करण्यास मान्यता देण्यात आली. केंद्र शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचना, मार्गदर्शक तत्वे यांचे काटेकोरपणे पालन करुन समायोजन करण्यास यावेळी मान्यता देण्यात आली आहे.

## बेरोजगार उमेदवारांसाठी आज

नोकरी इच्छुक उमेदवारांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने नोंदणी पूर्ण करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी ऑनलाईन अर्ज करावेत, जेणेकरून त्यांना मेळाव्यात सहभागी होता येईल. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२१७-२९५०९५६ या दुरध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन सहायक आयुक्त श्री.नलावडे यांनी केले आहे.

## मुंबादेवी, महालक्ष्मी मंदिर परिसर

नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, अतिरिक्त आयुक्त अश्र्विनी जोशी, नाना शंकरशेठ यांच्या कुटुंबातील विलास शंकरशेट, जिमी शंकरशेठ आणि पद्मिनी शेठ आदी उपस्थित होते.

मुंबईतील महालक्ष्मी, मुंबादेवी, हाजी अली प्राचीन देवस्थान आहेत. त्यांच्या सौंदर्यीकरणासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देतानाच भाविकांना सुलभ दर्शनासाठी सोयीसुविधा करण्यात याव्यात. महालक्ष्मी, मुंबादेवी मंदिराचा विकास करताना परिसरातील मंदिरांचे देखील सौंदर्यीकरण करावे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मंदिर परिसरात वाहनतळाची सोय करताना त्याच ठिकाणी स्वच्छतागृहांची देखील व्यवस्था करावी. मंदिरांचे सौंदर्यीकरण करतानाच प्राचीन स्थापत्य शैलीचा देखील वापर करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.यावेळी महालक्ष्मी मंदिर, मुंबा देवी मंदिर, हाजीअली दर्गा, जगन्नाथ शंकरशेठ स्मारक व भागोजी शेठ कीर स्मारकाच्या कामांचे सादरीकरण करण्यात आले. जगन्नाथ शंकरशेठ स्मारक वडाळा येथे करण्यात येत असून मुंबई महापिलेकने तातडीने ३५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून द्यावा आणि स्मारकाचे काम वर्षभरात पूर्ण करावे, असे मुख्यमंत्र्यांनी महापालिकेला सांगितले.

## तीसरी मुंबई उभारण्याचे काम एम

झाला पाहिजे.विमानतळ परिसरातील झोपडपट्टयांचा देवेंद्र फडणविस मुख्यमंत्री असताना सर्व्हे झाला होता.त्या नंतर पुनर्विकासाच्या कामाची कोणतीही हालचाल झालेली नाही.विमानतळ परिसराच्या झोपडपट्टयांचा पुनर्विकास करण्यासाठी एम.एम.आर.डी. आणि राज्य शसनाने लक्ष द्यावे अशी सुचना ना.रामदास आठवले यांनी केली.

## भाजप उमेदवारांची दुसरी यादी

- चंद्रपूर, प्रतापराव चिखलीकर - नांदेड, रावसाहेब दानवे - जालना, भारती पवार - दिंडोरी, कपिल पाटील - भिवंडी, पियूष गोयल - उत्तर मुंबई, मिहिर कोटेचा - मुंबई उत्तर पूर्व, मुरलीधर मोहोळ - पुणे, सुजय विखे पाटील - अहमदनगर, पंकजा मुंडे - बीड, सुधाकर श्रृंगारे - लातूर, रणजीत सिंह नाईक निंबाळकर - माढा आणि संजयकाका पाटील यांना सांगलीतून लोकसभेचं तिकीट देण्यात आलं आहे

दरम्यान, भाजपाने चार विद्यमान खासदारांचा पत्ता कट केला आहे. भाजपाने उत्तर मुंबई लोकसभा मतदारसंघातून गोपाळ शेट्टी यांच्या जागी पियूष गोयल यांना तर मुंबई उत्तर पूर्वमधून मनोज कोटक यांच्या जागी मिहिर कोटेचा यांना उमेदवारी दिली आहे. बीडमधून प्रीतम मुंडे यांच्या जागी पंकजा मुंडे, तर जळगावमधून उन्मेष पाटील यांच्या जागी स्मिता वाघ यांना उमेदवारी दिली आहे. महाराष्ट्रातील २० उमेदवारांसह भाजपाने देशभरातील इतर राज्यांमधील ५२ उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. यामध्ये कर्नाटकमधील २० उमेदवार, मध्यप्रदेशातले पाच, त्रिपुरातला एक, दादरा आणि नगर हवेलीमधील एक आणि तेलंगणमधले ६ उमेदवार जाहीर केले आहेत.

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या..

माध्यमातून वंचित आणि मागासवर्ग घटकांसाठी आर्थिक सहायता तसेच उद्योगांसाठीचे कर्ज सहज उपलब्ध होणार असल्याचे सांगून प्रधानमंत्री श्री. मोदी म्हणाले, सरकारने २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचा संकल्प केला आहे. देशातील सफाई कामगारांच्या आरोग्यासाठीही केंद्र सरकार काम करत असून त्यांना आज पीपीई किट वाटप करण्यात येत आहेत. तसेच त्यांना आयुष्मान भारत (आभा) कार्ड देण्यात येत आहे. आभा कार्डच्या माध्यमातून त्यांना ५ लाखांपर्यंतचे उपचार मोफत मिळणार आहेत.

प्रधानमंत्री मोदी म्हणाले की, एससी, एसटी आणि ओबीसी समुदायांना सक्षम करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. एससी, एसटी आणि ओबीसी तरुणांसाठी शिष्यवृत्तीत वाढ, वैद्यकीय जागांच्या अखिल भारतीय कोट्यामध्ये ओबीसींसाठी २७ टक्के जागांचे आरक्षण तसेच नीट परीक्षेत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रवेश आणि वंचित समुदायातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय परदेशी शिष्यवृत्ती देण्यात येत आहे विद्यार्थ्यांना विज्ञानाशी संबंधित विषयात पीएचडी करता यावी यासाठी नॅशनल फेलोशिपची रक्कमही वाढवण्यात आली आहे.




यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते मुंबईतील गणेश गुंड, उदय सावंत, लक्ष्मण भंडारी, सग्या पवार, सचिन केटकर, सुधाकर पडवळ, साईनाथ गिरोड या सफाई कामगारांना प्रातिनिधीक स्वरुपात पीपीई किट आणि आभा कार्डचे वाटप करण्यात आले.यावेळी प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी अहमदनगर जिल्ह्यातील नरेश साहेबराव अवचर या उद्योजकाशी संवाद साधला. नरेश हे कृषीतील निरूपयोगी पाण्यावर प्रक्रिया करण्याबाबत काम करत आहेत. त्यांनी असिम म्हणजेच डॉ. आंबेडकर सोशल इनोव्हेशन मिशन अंतर्गत अर्थसहाय्य मिळवून हा उद्योग सुरू केल्याचे सांगितले. त्यांच्या या उद्योगाने प्रभावित झाल्याचे सांगून प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी, कृषी सोबतच पर्यावरणासाठीही चांगले काम करत असल्याबद्दल नरेश यांचे कौतुक केले.

यावेळी देशातील १ लाख लाभार्थ्यांना पीएम सूरजच्या माध्यमातून ७२० कोटी रूपयाचे अर्थसहाय्य थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले. केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ (छइउऋऊ), राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ (छडऋऊ) आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (छडघऋऊ) या तीन राष्ट्रीय महामंडळामार्फत देशातील सर्व राज्यातील अनुसूचित जाती, इतर मागास वर्ग व सफाई कर्मचारी यांना अर्थसहाय्य करण्यासाठी सूरज पोर्टल सुरू करण्यात आले आहे. समाजातील सर्वात उपेक्षित घटकांचे उत्थान करणे हे या पोर्टलचे उद्दिष्ट आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# शिरोळ पंचायत समिती मार्फत घेण्यात येणाऱ्या STS परीक्षेत विद्यामंदिर टाकळीवाडीचे घवघवीत यश

टाकळीवाडी/प्रतिनिधीः तालुका शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळा यांची प्रज्ञाशोध परीक्षेमध्ये कुमार विद्यामंदिर टाकळीवाडी चे विद्यार्थी झळकले.

जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी, विद्यार्थिनी शिक्षणामध्ये कमी नाहीत हे यांनी दाखवून दिलेले आहे.


**इयत्ता १ली** १) स्वरा नामदेव निर्मळे=९६. केंद्रात द्वितीय २) श्रेयश प्रशांत खोत=९२. ३) राजलक्ष्मी युवराज माने=८८ ४) सुजय विशाल गोरे=८६ ५) सुयश प्रवीण निर्मळे=८० ६) रचिता स्नेहल कुमार कांबळे=८० इयत्ता दुसरी= १) त्रिशा योगेश कांबळे=९० २) गणेश संतोष सुतार=८६ ३) आरती उमेश निर्मळे=८४

**इयत्ता तिसरी** १) सर्वज्ञ नितीन गोरवाडे=१८०. केंद्रात प्रथम २) अथर्व अमोल चिगरे=१६२ ३) आरोही चेतन काने=१५८ ४) वेदांत संदीप गोरे=१५८ ५) जयवर्धन विशाल गोरे=१५२. सर्व यशस्वी विद्यार्थी विद्यार्थिनी यांचे गावांमध्ये कौतुक होत आहे.

यासाठी विशेष मोलाच सहकार्य मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शिक्षिका, पालक,शालेय समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, यांचे मोलाचे योगदान लाभले.

# नाविंदगी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या अध्यक्षपदी प्रभु गायचोडे





अक्कलकोट /प्रतिनीधी : मौजे नाविंदगी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीच्या अध्यक्षपदी प्रभु गायचोडे उपाध्यक्ष पदी भीमाशंकर ढाले यांची निवड करण्यात आली. भारतीय घटनेचे शिल्पकार बोधिसत्व प.पुज्य महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंती महोत्सवाच्या अध्यक्षपदी सर्व समाजबांधवांच्या सहमतीने निवड करण्यात आली.या वेळी मौजे नाविंदगी भीमनगर येथील समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थीत जयंतीची बैठक पार पडली आणि सगळ्यांच्या सहमतीने जेष्ठ समाजसेवक मा.प्रभु गायचोडे अध्यक्ष तर उपाध्यक्ष पदी मा. भीमाशंकर ढाले यांची सर्व समाजबांधवांच्या सहमतीने निवड करण्यात आले.

यावेळी बैठकीस उपस्थीत गतवेळीचे अध्यक्ष लक्ष्मण बनसोडे व उपाध्यक्ष संजय गायचोडे यांनी बैठकीचे आयोजन केले होते. सर्व समाज बांधवांच्या वतीने व भीमशक्ती तरुण मंडळाच्या नविन अध्यक्ष उपाध्यक्ष यांचा सर्वानुमते स्वागत करण्यात आले.

# वयोमर्यादा ओलांडणाऱ्या ५० ते ६० हजार उमेदवारांना मेगा पोलीस भरतीमध्ये एक संधी देण्याची उमेदवारांकडून मागणी

## पाच वर्षापासून पोलीस होण्यासाठी अहोरात्र तयारी 'आधी कोरोना ,आता शासनाचे दुर्लक्ष'

मुंबई : राज्यात सुरू असलेल्या पोलीस पोलीस शिपाई भरतीसाठी वयोमर्यादेमुळे अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांनी या भरतीची संधी देण्याची मागणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे .मार्च २०२३ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने काढलेल्या अध्यादेशाचा आधार घेत या उमेदवारांनी ही मागणी केली आहे. राज्यभरात असे ५०-६० हजार उमेदवार असल्याचे मागणी पत्रात नमूद करण्यात आले आहे, सामान्य प्रशासन विभागाने जाहीर केलेल्या अध्यादेशानुसार कोरोना काळात सदोष मागणी पत्रे किंवा मागणी पत्र न पाठवणे यामुळे अनेक पदांच्या भरतीसाठी पुरेशा जाहिराती प्रसिद्ध झालेल्या नाहीत, यामुळे वयोमर्यादा ओलांडलेल्या अनेक उमेदवारांनी परीक्षेला बसण्याची संधी गमावले आहेत अशा उमेदवारासाठी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत होणाऱ्या जाहिरातीसाठी अर्ज करण्यात वयोमर्यादेची अट खुल्या व आरक्षित प्रवर्गासाठी २ ते ५ वर्षांनी शिथिल करण्यात आली होती, या अध्यादेशाचा आधार घेत पोलीस शिपाई भरतीसाठी ही हा नियम लागू करण्याची मागणी उमेदवारांमधून होत आहे याबाबत स्पर्धा परीक्षा समन्वय समितीने माननीय उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र दिले आहे.




गेल्या सहा-सात महिन्यापासून भरती प्रक्रियेसाठी पाठपुरावा करीत असून,लवकर पोलीस भरती करण्याची मागणी केल्याचे या पत्रात नमूद केले आहे. पोलीस भरतीची जाहिरात ३१ डिसेंबर२०२३ पूर्वी निघणे अपेक्षित असताना ही जाहिरात फेब्रुवारी महिन्यामध्ये काढण्यात आली या तीन महिन्यात अनेक उमेदवारांनी कमाल वयोमर्यादा ओलांडली आहे, जाहिरात वेळेत प्रसिद्ध झाली असता तर सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशानुसार संबंधित उमेदवारांना या निर्णयांचा लाभ झाला असता,त्यामुळे या २०२२-२३ च्या भरती प्रक्रियेसाठी २०२१-२२ अनुसार वय गणना करावी किंवा वयोमर्यादा ओलांडणाऱ्या एक संधी द्यावी अशी मागणी उमेदवाराकडून केली जात आहे.

डिसेंबर २०२३ च्या आधी जाहिरात निघाल्यास कोरोनामुळे संधी गेलेल्या उमेदवारांना देखील वयोमर्याच्या अटीत बसून भरतीसाठी पात्र ठरले असते मुलांची मागणी रास्त वाटते त्यांच्या फायदा होत असेल तर आढावा घेऊन बदल केला जाईल असे आश्र्वासन 'माननीय गृहमंत्री, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस' यांनी दिले होते मात्र त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही.

**– विजय बिदरकोटे,– जिल्हाध्यक्ष,**
**स्पर्धा समन्वय समिती महाराष्ट्र राज्य, सोलापूर जिल्हा**

**उमेदवारांची मागणी...**

३ मार्च २०२३ रोजी सामान्य प्रशासन विभागामार्फत दोन वर्ष कमाल वयोमर्यादा वाढवून देण्यात आली होती त्यानुसार ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत भरती होणे अपेक्षित होते. ही भरती २०२२-२३ साठी आहे त्यानुसार यात वय गणना २०२१ २२ व २३ या वर्षासाठी वर्षातील करावी किंवा २०२१ २२ व २३ या वर्षात वयोमर्यादा ओलांडणाऱ्या उमेदवारांना केवळ एक संधी द्यावी.

यापुर्वी झालेली पोलीस भरती

| वर्ष | पदांची संख्या |
|---|---|
| २०१६ | ४३०० |
| २०१७ | १७१७ |
| २०१८ | ३२८७ |
| २०१९ | ३७५७ |
| (२०१९मध्ये पार पडली) | |
| २०२१ | १८३३१ |
| (२०२२ मध्ये पार पडली) | |

२०१९ पासून बँड पथक व कारागृह पोलीस भरती झाली नाही २०२४ मध्ये छत्तीसगड मध्ये ५ वर्षे ,राजस्थानात ४ वर्षे, आणि उत्तर प्रदेश व केंद्रीय बोर्डाने ३ वर्षे वय वाढवून दिले मग आपल्या राज्यात केवळ ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत वय वाढवून देणे का शक्य नाही...? असा संतप्त प्रश्र्न तरुणांच्या मनात निर्माण होत आहेत, 'राज्याच्या सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांनी' येणारी भरती वय वाढ या मुद्द्यावर निघणार असल्याचे स्पष्ट केले होते मात्र आता त्याकडेच दुर्लक्ष झाल्याचे तरुणांकडून संताप व्यक्त होत आहे.

# आयपीएस अधिकारी संदिप भाजीभाकरे यांच्या घरातील हजारो पुस्ताकाचा ग्रंथालय प्रेरणादायी : सुधीर सोनकवडे

सोलापूर/प्रतिनिधीः जिथे नाही पुस्तकाचे कपाट ते घर होईल भुईसपाट, असे म्हटले जाते.परंतु सध्या सोशल मीडियाचा वापर अधिक वाढला असून लहान बालकांपासून ते थोरांपर्यंत पुस्तके वाचण्याचे प्रमाण घटले असल्याचे चित्र आहे. याला कारण म्हणजे सध्या इंटरनेट, मोबाईलच्या या जमान्यात नव्या पिढीने पुस्तकांकडे जणू पाठच फिरवली आहे. त्यामुळे वाचाल तर वाचाल, असे म्हणण्याची वेळ आली आहे.पण असे काही पुस्तकं वेडे, पुस्तक प्रेमी,वाचक असतात आताच्या स्मार्ट मोबाईल जमान्यात सुध्दा पुस्तके वाचण्यात मग्न असतात. सोलापूर जिल्ह्याचे सुपुत्र सध्या मुंबई येथील पश्र्चिम रेल्वेत पोलिस उपायुक्त पदावर असलेले संदिप भाजीभाकरे साहेब यांनी असेच आगळें वेगळे इतरांना प्रेरणा मिळेल असे आपल्या घरात स्वतंत्र हजारो पुस्ताकाचे ग्रंथालय उभे केले आहे. सुट्टी च्या दिवशी फक्त पुस्तक वाचणे हाच दिनक्रम असतो.विविध प्रकारांचे हजारो पुस्तके त्यांच्या संग्रही आहेत.

मा.संदिप भाजीभाकरे साहेब संपूर्ण महाराष्ट्राला त्याची ओळख आहे म्हणजे कधी काळी दुष्काळी पट्टा असा कायमस्वरुपी शिक्का लागलेल्या उपळाई बुद्रुकची ओळख आता स्पर्धा परीक्षेची पंढरी अशीच बनली आहे. या गावात ३



आयएएस, १ आयआरएस व १ आयपीएस असे प्रशासनातील उच्च अधिकारी आहेत. शिवाय ५० हून अधिक जण अधिकारी बनले आहेत. माढा शेटफळ रस्त्यावर नऊ हजार लोकसंख्या असलेले उपळाई बुद्रुक हे गाव आहे. युवकांच्या सनदी अधिकारी' होण्याच्या प्रवासात यशात मोठा वाटा आहे, तो गावातील जिल्हा परिषदेच्या मराठी शाळा अन् रयत शिक्षण संस्थेच्या नंदिकेश्र्वर विद्यालयाचा.स्पर्धा परीक्षांची पंढरी म्हणून माढा तालुक्यातील उपळाई बुद्रुक गावची ओळख आता राज्याच्या प्रशासनात बनली आहे. या गावात प्रशासनातील उच्चपदस्थ अशा तब्बल ५० अधिकाऱ्यांचं घर आहे. गावाने प्रशासनातील अधिकाऱ्याचं अर्धशतक झळकावलं असून यात महिला आयएसएस अधिकारी रोहिणी भाजीभाकरे याही याच गावच्या कन्या आहेत. तर, त्यांचे बंधु संदीप भाजीभाकरे हेही आयपीएस आहेत. त्यामुळे, या गावच्या मातीची गोष्टच निराळी आहे. प्रचंड कष्ट, जिद्द, चिकाटी व परिश्रम हे उपळाईतील युवकांच्या यशाचे गमक आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करत गावातील युवकांनी यश संपादन केले आहे. अधिकारी झालेल्या युवकांची नागरिक गावातून मिरवणूक काढतात. त्यातून इतरांना प्रेरणा मिळत आहे. गेली दहा ते पंधरा वर्षांपासून स्पर्धा परीक्षेतील उपळाईच्या यशाचा झेंडा युवकांनी कायम ठेवला आहे. मा.संदिप भाजीभाकरे साहेब यांची ग्रंथसंपदा थक्क करणारी आहे. वागदरी चे स्वातंत्रवीर सावरकर सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष व तिर्थ प्रशालेचे प्राचार्य सुधीर सोनकवडे यांनी भाजीभाकरे साहेब यांच्या घरातील ग्रंथालयास भेट दिली यावेळी राजकुमार निरोळी, वागदरीचे माजी सरपंच रवी वरनाळे,सिध्दू कोळी, संतोष मडिवाळ व सायबू गायकवाड उपस्थित होते.

# कल्याण मंध्ये समता संघर्ष सांस्कृतिक मंचचे रंगले कवी संमेलन



ठाणे : मिलिंद जाधव तरुणांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व सांस्कृतिक चळवळ अधिक गतिमान करण्यासाठी १२ मार्च २०२४ रोजी समता संघर्ष सांस्कृतिक मंच (ठाणे-मुंबई) यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त खुळे कवी संमेलन कल्याण येथे घेण्यात आले.

ज्येष्ठ रंगकर्मी सुधाकर वसईकर यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. तर प्रस्ताविक समता संघर्ष संघटनचे अध्यक्ष शैलेश दोंदे यांनी मांडले. यावेळी कवी ज्येष्ठ कवी शाम भालेराव, जगदेव भट्ट, संजय इधे, मिलिंद जाधव, अक्षय भोईर, सुरेखा पैठणे, रोहीत जाधव , दुहिता जाधव,किशोर उजगरे, विजय येडे, प्रीती माने, कैलास म्हस्के, जितरत्न जाधव, संजीवकुमार शिंदे यांनी विविध विषयांवर कविता सादर करत प्रबोधन केले.

तर नाट्य कलाकार कोमल खामकर व सायली पावसकर यांनी लोककला सादर केली. यावेळी समता संघर्ष संघटन अध्यक्ष शैलेश दोंदे, समता संघर्ष संघटनचे उपाध्यक्ष सदानंद गायकवाड, गणेश सोष्टे, गौतम जाधव, अविनाश दोंदे,अँड.श्रीकांत कांबळे, अँड.दिलीप वाळंज,रविंद्र गायकवाड, कृष्णा गायकवाड, राजेश देवरुकर उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेखा पैठणे यांनी केले.

# रब्बी धानपिकाला नियमित पाणी पुरवठा करा...

## मुन्नाभाई नंदागवळी यांची मागणी : रब्बी धानपिक संकटात सापडू नयेत

अर्जुनीमोरगाव : आपला भाग म्हणजे खेड्यापाड्याचा भाग आहे, ग्रामीण भागाचे जगणे हे सर्व शेती या व्यवसायावर अवलंबून असते, तशाच प्रकारे तालुक्यातील व आजूबाजूचा परिसर हा शेतीच्या धानपिकावर जगत असून आपला उदरनिर्वाह करतात, यामुळे परिसरातील धानपिकाला संबंधित विभागाने व पाणी पुरवठा करणा-या समितीने जाती लक्ष घालून पाचही गावांना नियमित व आवश्यक पाणी पुरवठा करा अशी मागणी तरुणांचे युवा आयकॉन व बुलंद आवाज मुन्नाभाई नंदागवळी यांनी केली आहे.



नवेगावबांध तलावाचे पाच गावांना रब्बी धानपिकाला कालव्याद्वारे पाणी पुरवठा करावा लागतो, तरच सर्व शेती ही पिकणार आहे, रब्बी धानपिकाची रोवणी होऊन धानपिक मस्त डूलत आहे, लहरी मारत आहे, पण अशातच जर पाणी एखाद्या वेळी वेळेवर नाही मिळाले तर त्या धानपिकाचे नुकसान होईल, असे होऊ नये म्हणून पाणी पुरवठा करणारे संबधित विभागाने अती दक्षपणे लक्ष घालावे. तसेच पाणी पुरवठा करणारी समिती आहे यांनी वेळोवेळी पाठ पुरावा करायला हवा.

**बाराभाटी मायनरला पाणी पोहचू दया** नवेगावबांध जलाशयाचे पाणी जेव्हा धान पिकासाठी पुरवठा केला जातो, तेव्हा अर्ध्या मध्ये देवलगाव येथे पाणी आडवा केला जातो, त्यामुळे अनेकदा येरंडी गावातील शेतकरी बांधवांना बाराभाटी मायनरला पाणी पोहचतच नाही. अशाने मग एका पाण्यासाठी धानपिक मरतो. असे होऊ नये.

**रब्बी संकटात येवू नये.** शिल्लक पाण्यासाठी शेतीची नुकसान करु नका, सुरळीत व नियमित आवश्यक अशाप्रकारे पाणी पुरवठा करा, जेणेकरून रब्बी संकटात सापडणार नाही, याची खबरदारी घ्यावी. सर्व पाचही गावांच्या पाणी पुरवठा होऊ दया, जेणेकरून सर्व लहान मोठ्या शेतकरी बांधवांची शेती पिकायला पाहिजे अशी मागणी तरुणांचे युवा आयकॉन व बुलंद आवाज मुन्नाभाई नंदागवळी यांनी केली आहे.

# मुस्लिम युवा संघटनेतर्फे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन



अक्कलकोट/प्रतिनिधीः दुधनी येथील मुस्लिम युवा संघटना कडून रोजदार लोकांना इफ्तार पार्टीचे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी अक्कलकोट तालुका काँग्रेस अध्यक्ष शंकर मालक म्हेत्रे यांनी उपस्थित राहून सर्व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दीले व मुस्लिम युवक संघटनेतर्फे रोजेचे वेळापत्र सुद्धा शंकर मालक म्हेत्रे यांच्या हस्ते वाटप करण्यात आला .यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून झाकीर साब अत्तार, तोला साब गुलबर्गा ,गुलाब रेवर ,बाबू मोमीन अल्लाउद्दीन नदाफ,इमामशा मकानदार,पेशमाम ,सलीम मौलाना, मुबारक भाई कोरबु,आझम शेखजी,इब्राहिम अत्तार, महीबुब बिल्लाड,सैयद शेख, महीबुब शेखजी,फिरोज पठाण मुस्लिम युवक संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# पडघा येथे कार्यशाळा व चर्चासत्र संपन्न

भिवंडी/मिलिंद जाधव : महिला आर्थिक विकास महांडळ, जिल्हा ठाणे (महाराष्ट्र शासन अंगिकृत) भरारी लोकसंचालित साधन केंद्र, पडघा ता. भिवंडी, जि. ठाणे नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिलाउद्यम विकास कार्यक्रमातंर्गत माविम मित्र मंडळ यांचे लिंग समभाव संचेतना कार्यशाळा व चर्चासत्र दिनांक १२ मार्च २०२४ रोजी पडघा ग्रामपंचायत कार्यालय येथे पार पडले.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पडघा विभागात एकूण माविनचे ३४ गावे सक्रिय असून ४३९ महीला बचत गट तयार आहेत. वर्षभरात ११ ते १२ कोटीची आर्थिक उलाढाल विविध व्यवसायिक कर्जा मार्फत होत असते. असे प्रास्ताविकेत भरारी सी.एम. आर.सी व्यवस्थापक विद्या गायकवाड यांनी बोलतांना सांगितले. आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी महिलांनी पुढाकार घेतला पाहिजे. गावपातळीवर महिलांना एकत्र करून बचत गट मार्फत विविध योजनांचा लाभ घेतला पाहिजे असे सी.एम. आर.सी अध्यक्षा रंजुषा जाधव यांनी बोलताना सांगितले.

लिंग समभाव व स्त्री पुरुष समानता,महिलेला मानाचे स्थान या बाबत आदेश जाधव यांनी मार्गदर्शन केले. महिलांना गाव पातळीवर सहकार्य केले पाहिजे तसेच गाव विकासासाठी व महीलांच्या विकासासाठी कशाप्रकारे सहभाग होईल याबत माविम मित्र मंडळ अध्यक्ष अँड .भरत पाटील यांनी मार्गदर्शन केले.तर स्त्री पुरुष समानता या बाबत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेश जाधव , माविम मित्र मंडळ सदस्य कमलेश जाधव व प्रदीप गायकवाड यांनी आपले मत व्यक्त केले.तर कवी पत्रकार मिलिंद जाधव यांनी घरोघरी आता सावित्री हाय कविता सादर करीत प्रबोधन केले. यावेळी पडघा




ग्रामपंचायत सरपंच प्रभावती जाधव ,उपसरपंच शैलेश बिडवी, सी.एम. आर.सी अध्यक्षा रंजुषा जाधव, व्यवस्थापक विद्या गायकवाड, मुख्यसेविका वंदना जाधव, माविम मित्र मंडळ सी आर. पी. सदस्या ,लेखापाल व सह्योगीनी उपस्थित होत्या.

# जि.प.समाज कल्याण विभागाच्या वतीने दलित वस्ती सुधारणा योजनेची रक्कम त्वरित वितरण करण्याची रिपाईंची मागणी

अक्कलकोट/प्रतिनिधी : जिल्हा परिषद सोलापूर समाज कल्याण विभागाच्या वतीने दलित वस्ती सुधारणा करण्यासाठी दरवर्षी निधी उपलब्ध करुन देण्यात येत होते. मात्र यावर्षी अक्कलकोट तालुक्यातील सर्व गावातील दलित वस्ती सुधारणा कामाच्या अनुदानाची रक्कम मार्च महिना म्हणजे आर्थिक वर्षांत निधी खर्च करण्या ऐवजी ती निधी तसेच अखर्चीक राहिल्याने दलित बांधवाना त्यांच्या सोयीपासून वंचित राहावे लागले आहे. समाज कल्याण अधिकारी खमीतकर तसेच लिपीक गायकवाड मॅडम यांनी अनेक गावांमध्ये आर्थिक देवाण घेवाण करुन टक्केवारी घेऊन निधी मंजूर करुन दिली आहे. तरी समाज कल्याण विभागाच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची खातेनिहाय चौकशी करून त्यांच्या वर योग्य ती कारवाई करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केली आहे. त्यांनी अक्कलकोट तालुक्यातील बोरोटी, मातनहळ्ळी, उडगी, सलगर, तडवळ, मुंढेवाडी, कलप्पावाडी, आंदेवाडी, संगोळगी (अ), चिक्केहळ्ळी, खानापूर, बासलेगाव, बबलाद, सिंदखेड, बादोले बु., सातनदुधनी, आदी गावांमध्ये दलित वस्तीतील विविध



विकास कामासांठी केंद्रीय सामाजिक न्यायराज्यमंत्री रामदास आठवले यांच्या कडे निधीचे मागणी केली होती. त्याप्रमाणे केंद्रीय सामाजिक न्यायराज्यमंत्री रामदास आठवले यांनी सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांना वरील गावांमध्ये निधी उपलब्ध करून दलीत वस्ती सुधार योजनेसाठी २.६० रुपये वितरित करुन दलित बांधवांना सोई सुविधा उपलब्ध करून त्यांना होणाऱ्या गैरसोयीपासून दूर करुन त्यांना सहकार्य करावे अशाप्रकारचे जिल्हा नियोजन समितीला पत्र पाठवून देखील सोलापूर जिल्हा परिषद समाज कल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे दलित बांधवांना विकासापासून वंचित राहावे लागत आहे. तरी मार्च महिन्याच्या अखेरपर्यंत वरील गावच्या दलित वस्ती सुधारणा योजनेची रक्कम त्वरित वितरण न झाल्यास रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट अक्कलकोट तालुक्याच्या वतीने समाज कल्याण कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा रिपाइंचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी दिले आहे.

# मागासवर्गीय लाभार्थ्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑनलाईन संवाद साधला

सोलापूर/प्रतिनिधीः पंतप्रधान सुरज योजना समाज कल्याण मंत्रालय नवी दिल्ली यांच्या माध्यमातून देशातील मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी अनुसूचित जातीच्या व इतर मागासवर्गीय यांच्यासाठी वैयक्तिक लाभ, सफाई कामगारांच्या सरंक्षणासाठी पीपीई किट आयुष्यमान कार्ड या योजनेच्या माध्यमातून विकास घडवण्याचा संदर्भात मागासवर्गीय लाभार्थ्यांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ऑनलाईन संवाद साधला. नियोजन भवन येथील सभागृहात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त नागनाथ चौगुले यांच्या सह अनुसूचित जाती व इतर मागासवर्गीय कल्याण मंडळाचे विविध योजनांचे लाभार्थी



उपस्थित होते.

यावेळी सामाजिक न्याय विभागाच्या अंगीकृत महात्मा फुले महामंडळ अण्णाभाऊ साठे महामंडळ संत रोहिदास महामंडळ व महानगरपालिका सफाई कामगार आयुष्यमान कार्डचे लाभार्थी यांच्या विकासासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नागनाथ चौगुले महामंडळाचे व्यवस्थापक पवार यांच्या उपस्थितीत महामंडळाच्या लाभार्थ्यांना १ लाख ते १० लाखापर्यंत चे धनादेश वाटप करण्यात आले. तसेच महानगरपालिकेच्या सफाई कामगारांना झझए किटचे वाटप व आयुष्यमान कार्डचे वाटपही यावेळी करण्यात आले.

नवी दिल्ली सामाजिक न्याय विभागाचे समन्वय अधिकारी सिंग महामंडळाचे व्यवस्थापक पवार यांच्या उपस्थितीत ३१० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आले. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी शासनाच्या योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी शासन कटिबध्द आहे असे सांगितले. या कार्यक्रमासाठी सातारा, सांगली आणि सोलापूर येथील लाभार्थी उपस्थित होते.

# सुशिक्षीत बेरोजगार युवक-युवतींना अर्ज करण्याचे आवाहन

परभणी :अनुसूचित जमातीच्या शेतकरी, सुशिक्षीत बेरोजगार युवक युवतींना वैयक्तिक, सामुहिक लाभ घेण्यासाठी इच्छुक लाभार्थ्यांनी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कळमनुरी जि.हिंगोली यांच्या नावे योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रासह अर्ज दि. २० मार्च पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करण्याचे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे यांनी केले आहे.

आदिवासी लाभार्थ्यांना ८५ टक्के अनुदानावर शेळी गट घेण्यासाठी अर्थसहाय्य योजनेसाठी रहिवासी प्रमाणपत्र, सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र (तहसिल कार्यालय), आधार कार्ड, अपंग असल्यास प्रमाणपत्र, विधवा, परितक्ता असल्यास प्रमाणपत्र, दारिद्र्य रेषेखालील असल्यास प्रमाणपत्र, राशन कार्ड, आधार संलग्न केलेल्या बँक पासबुकची प्रत तसेच आदिवासी बचत गटांना शेळी गट (१० शेळी व १ बोकड) घेण्यासाठी अर्थसहाय्य योजनेसाठी रहिवासी प्रमाणपत्र सर्व सदस्य, सक्षम अधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र, सर्व सदस्य, बचत गटाचे नोंदणी प्रमाणपत्र, सदस्य अपंग असल्यास प्रमाणपत्र, सदस्य विधवा, परितक्ता असल्यास प्रमाणपत्र, गटाची बँक पासबुकची प्रत कागदपत्रांची आवश्यकता आहे.

विहित मुदतीनंतर आलेले व परिपुर्ण नसलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. उपरोक्त योजनांमध्ये अंशतः/पुर्णतः बदल करण्याचे तसेच वरीलपैकी कोणतीही योजना राबविण्याचा अथवा न राबविण्याचा अधिकार प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, कळमनुरी जि. हिंगोली यांनी राखुन ठेवलेला आहे, तरी प्रकल्पांतर्गत असलेल्या लाभार्थ्यांनी योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रकल्प कार्यालयात अर्ज सादर करण्याचे आवाहन प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे यांनी केले आहे.

# राज्याच्या तिजोरी वर दरोडा टाकणाऱ्यातला मी नाही दौलत दरोडा : आमदार शहापूर विधानसभा

शहापूर/प्रफुल्ल शेवाळे :राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चा कार्यकारिणी मेळावा आणि कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर शहापूर मध्ये पार पडले.यानिमित्ताने विविध कार्यकर्ते यांना नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले... संपूर्ण शहापूर तालुका आणि ग्रामीण भागातील विविध कार्यकर्ते आणि विशेष करून महिलांचा मोठा सहभाग यावेळी दिसून येत होता.. मार्गदर्शन पर भाषणात शहापूर तालुक्याचे आमदार दौलत दरोडा यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आपल्या विधानसभा क्षेत्राला २६५ कोटींचा भरघोस निधी उपलब्ध करून दिला आहे... आणि यामुळे तालुक्यातील विविध विकासासाठी याचा निश्र्चित फायदा होणार आहे.. आणि अशा भरीव निधी मुळे मला राज्याच्या तिजोरीवर आणखीन दरोडा टाकायचा नाही.. माझं नावं दौलत असल्यामुळे मला दरोडा टाकायचा प्रश्न येत नाही असे सूतोवाच करताच उपस्थितांमध्ये हशा पिकला...

ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भारत गोंधळे यांनी कार्यकर्ता घडवणे आणि त्याची मर्जी राखणे हे एक आव्हान असल्याचे नमूद केले.. तर महिला जिल्हा अध्यक्ष कल्पनाताई तारमळे यांनी महिलांच्या विविध प्रश्नांना बगल देण्यासाठी महिला आयोग आणि महिला बाल विकास विभागाचे दरवाजे ठोठवून आपल्या प्रश्नांना सोडविण्यासाठी पाहिजे ते प्रयत्न करू असे मार्गदर्शन केले आहे..

शहापूर तालुका अध्यक्ष





डॉ. मनोहर सासे यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा यांचे विचार संपूर्ण शहापूर तालुक्यातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी शक्य ते प्रयत्न करू... आणि आपला पक्ष मजबूत कसा होईल याकडे लक्ष देऊन सर्व कार्यकर्त्यांना घेऊन शहापूर तालूक्याच्या सर्वांगीण विकासाच्या तत्सम वाटचाल करीत पुढे चालत राहू असे म्हटलं आहे..सदर मेळाव्याला शहापूर चे आमदार दौलत दरोडा, ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्ष भरत गोंधळे, प्रदेश सरचिटणीस किसनराव तारमळे, जिल्हा महिला अध्यक्ष कल्पनाताई तारमळे, कल्याण ग्रामीण अध्यक्ष बाळा कोर्र, शहापूर तालुका अध्यक्ष डॉ. मनोहर सासे, तालुका महिला अध्यक्ष मोरगे ताई, युवा नेते करणं दरोडा,राष्ट्रवादी युवक तालुका अध्यक्ष दिनेश चंदे, शहापूर तालुका सोशल मीडिया अध्यक्ष प्रफुल्ल शेवाळे, सोशल मीडिया जिल्हा ग्रामीण अध्यक्ष वैभव विशे आणि इतर तरुण पुरुष आणि महिला कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.. कार्यक्रम सूत्रसंचालन ठाणे जिल्हा ग्रामीण चे प्रवक्ते मुकेश दामोदरे सर यांनी केलं.. पुरोगामी विचारांनी प्रेरित होऊन पक्षाची भक्कम वाटचाल पुढे नेण्यासाठी आपण सर्व कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांनी आपआपल्या परीने मेहनत घेणे गरजेचं आहे असा सल्ला यानिमित्ताने दामोदरे सर यांनी उपस्थितांना दिला आहे..

# होपमिरर फाऊंडेशनने केले संस्थापकांच्या मूळ गावात आरोग्य तपासणी शिबिर

पनवेल/प्रतिनिधीः होपमिरर फाउंडेशनने संस्थापक अध्यक्ष रमजान शेख यांच्या मूळ गावी, होपमिरर फाउंडेशनने मोफत आरोग्य





तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. २३ मार्च १९९२ रोजी जन्मलेले भारतीय उद्योजक रमजान शेख यांचे मूळ गाव धानसर, होपमिरर फाउंडेशनने मोफत वैद्यकीय जागरूकता-सह-आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन गावात केले होते. अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबई यांच्या सहकार्याने होपमिरर टीमने धानसर मध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. गावातील ग्रामस्थांसाठी आरोग्यविषयक जनजागृती आणि विविध आजारांवर दर्जेदार उपचार मिळावेत यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांची आरोग्य स्थिती तपासण्यासाठी आणि आरोग्य व्यवस्थापनाबाबत सल्ला देण्यासाठी कार्यकारी आरोग्य तपासणी कार्यक्रम घेण्यात आला. या शिबिरात एकूण १५० हून अधिक नागरिकांनी उपस्थित राहून आरोग्य तपासणी करून घेतली. यावेळी विविध प्रकारची तपासणी करण्यात आली.अपोलो हॉस्पिटल टीम तसेच होपमिरर फाउंडेशन टीम यांच्यामोलाचे सहकार्य लाभले. त्यांनी महत्त्वाची कामगिरी बजावत सामाजिक बांधिलकी जपली आहे असे होपमिरर फाउंडेशनचे संस्थापक रमजान शेख यांनी बोलताना सांगितले.

# पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने जागतिक महिला दिन साजरा

नाशिक :८ मार्च जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा केला जात असताना नाशिक मधील पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने देखील जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान २१ महिलांचा सन्मान करण्यात आला. लायन्स क्लब सभागृह नवी पंडित कॉलनी शरणपूर रोड या ठिकाणी हा सन्मान सोहळा पार पडला. विविध क्षेत्रातील महिलांचा गौरव व्हावा यशाकडे वाटचाल करण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केलं जावं या हेतूने पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष व आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमीचे संचालक प्रा.डॉ.आनंद रत्नाकर आहिरे यांनी या कार्यक्रमाचं आयोजन केलं होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षा सुप्रसिद्ध कवयित्री माननीय.स्नेहल अभ्यंकर अमरावती, प्रमुख पाहुणे,सुप्रसिद्ध अभिनेत्री माननीय निवेदिता पगार व व्हि आय पी सिक्युरिटी नाशिक युनिट पोलिस दलातील सहाय्यक पोलीस निरीक्षक माननीय अनिता पाटील उपस्थित होत्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस महामाताच्या प्रतिमेस प्रमुख पाहुण्याच्या शुभ हस्ते





पुष्पहार अर्पण करण्यात आले.त्यानंतर प्रमुख पाहुण्याचे स्वागत कार्यक्रमाचे आयोजक प्रा. डॉ.आनंद रत्नाकर आहिरे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा डॉ.आनंद रत्नाकर आहिरे यांनी करतांना स्त्री व पुरुष दोघेही महत्वाचे आहेत. स्त्री चा इतिहास स्पष्ट केला. पुष्परत्न बहुउद्देशीय सेवाभावी संस्था दरवर्षी जागतिक महिला दिन साजरा करुन महिलांना प्रेरीत करते.निवेदिता पगार यांनी स्त्रियांची प्रगती स्पष्ट करतांना तिची विविध प्रकारची भूमिका व्यक्त केली. या कार्यक्रमास महाराष्ट्र मधील कर्तृत्ववान महिलांचा संस्थेतर्फे विविध पुरस्कार देऊन पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये माननीय सुप्रसिद्ध अभिनेत्री निवेदिता पगार, उत्कृष्ट अभिनेत्री,ए.पी.आय, माननीय अनिता पाटील यांना उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी,सुप्रसिद्ध कवयित्री माननीय.स्नेहल अभ्यंकर अमरावती यांना पुष्परत्न काव्य गौरव, माननीय सुशिला बिडकर,अमरावती यांना हिरकणी, माननीय भाग्यश्री गुजर,नाशिक यांना पुष्परत्न काव्य गौरव,नाशिक लोकशाही न्यूज चॅनेल च्या व्यवस्थापक मा.अनिता लचके यांना उत्कृष्ट व्यवस्थापक, माननीय श्रद्धा दुसाने नाशिक यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले,माननीय उज्वला नगराळे चंद्रपूर यांना हिरकणी, माननीय. अलका शिंदे ठाणे यांना पुष्परत्न काव्य गौरव, माननीय राणी गायकवाड,नाशिक यांना पुष्परत्न काव्य गौरव,माननीय चंद्रभागा कांडेकर लाखलगाव यांना व्यवस्थापक, पेनेसिया आय व्हि एफ सेंटर संचालिका डॉ.सोनाली गांगोले नाशिक यांना उत्कृष्ट व्यवस्थापन, माननीय आशाताई मोरे नाशिक यांना पुष्परत्न काव्य गौरव व कोल्हापूरच्या डॉ.प्रतिभा पैलवान यांना पुष्परत्न काव्य गौरव अशा विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले विशेष सन्मान उत्कृष्ट सूत्रसंचालन मा. मनिषा कापुरे नाशिक यांनी केले म्हणून करण्यात आला. राष्ट्रीय कविसंमेलनात सहभागी कवयित्री मा.सिमाराणी बागुल, मा. कविता बिरारी, मा.सिल्केषा आहिरे,मा. संध्यारजनी सावकार, मा.अलका दराडे, मा. अलका शिंदे, मा.सुनंदा पाटील, मा.शालिनी सुर्वे,भाग्यश्री गुजर, मा.राणी गुंबाडे ,मा.राणी गायकवाड, मा.उज्वला नगराळे,मा.कविता कासार,मा.अर्चना नावरकर मा.मनिषा पाटील आदींनी महिला दिनानिमित्त विविध विषयावर अतिशय आशयपूर्ण कविता सादर केल्या.संपूर्ण कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा.माणिकराव गोडसे नाशिक यांनी केले तर संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन कापुरे नाशिक यांनी केले.

# रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन चे छात्र सेवकाल शिबिर संपन्न!





रेणापूर/प्रतिनिधीः रेणुका कॉलेज ऑफ एज्युकेशन रेणापूर येथील शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील बी एड प्रथम व द्वितीय वर्षातील छात्र अध्यापकांचे छात्र सेवकाल शिबिर जिल्हा परिषद प्रशाला रेणापूर येथे यशस्वीरित्या पार पडले.या शिबिराचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ कैलास मोटे, जि. प प्रशाला मुख्याध्यापिका सारणिकर मॅडम यांच्या हस्ते झाले या शिबीरामध्ये प्रशिक्षणार्थींनी शाळेतील शैक्षणिक कामकाजविषयी माहिती जाणून घेतली तसेच शाळेतील विविध उपक्रमामध्ये भाग घेतला.हे छात्र सेवाकाल शिबीर कॉलेजचे प्रा. शशिकांत चीलरगे , डॉ हिरकन शेटकर, प्रा.उमेश रणदिवे,प्रा.उत्तम दुधभाते ,प्रा.रतन लहाने, प्रा,रमाकांत गायकवाड , प्रा.अंकुश भगवान,अंकुश मॅडम, ठोंबरे मॅडम व इतर कर्मचारी शाळेचे विद्यार्थी सर्व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थित संपन्न झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन छात्र अध्यापिका. अश्र्विनी रोहिनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन छात्र अध्यापिका दिपाली केंदे यांनी केले.

# इब्राहिमपूर जिल्हा परिषद कन्नड शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

इब्राहिमपूर/प्रतिनिधीः येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड शाळेची स्नेहसम्मेलन भवानी मंदीर पठांगण मध्ये संपन्न झाले,कार्यक्रमाचे अध्यक्ष- संजयकुमार यशवंत पाटील होते.कार्यक्रमाचे उद्घाटक महादेव शिवनिंगप्पा रेऊरे होते.कार्यकारी अध्यक्ष बंडेप्पा बाबूराव कौलगी होते.प्रतिमा पूजन शिवनिगप्पा कौलगी व शाणप्पा बिराजदार यानी केलं,स्टेज पूजा महांतेश बनसोडे यानी केली व वाद्य पूजा संजीवकुमार बनसोडे यांचे हस्ते करण्यात आले, दिप प्रज्वलन मल्लीनाथ कुंभार व शिवलिंगप्पा दिंडूरे यांनी केली,कार्यक्रमात लोकनृत्य,देशभक्ती गीते, हास्य डॉन्स,मुकाअभिनय, हास्य नाटक,भूताचे नृत्य, पोपीट डान्स, लावणी डान्स इत्यादी कार्यक्रम अतिशय सुंदररित्या शाळेतील मुलांचे सुप्त गुण कौशल्य पाहुन गावकरी मंडळी कौतक केले. कार्यक्रमास अक्कलकोट तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे साहेब यांनी उपस्थित राहुन शाळेची मुलांची कौतुक केले गावातील पालक वर्ग, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व मंडळी,बमलिंगप्पा देशमुख, भिमाशंकर कौलगी, श्रीकांत कौलगी, कल्लप्पा कौलगी, गुडेराव टोणे, महांतेश नरुणे, शिवलिंगप्पा टोणे, हणमंत टोणे, रमेश बनसोडे, सिद्धाराम बनसोडे, इरण्णा करडे सर, गणपती दळवाई सर, कल्येणी करडे सर, मल्लीनाथ टोणे सर, विश्र्वनाथ कौलगी सर, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विस्ताराधिकारी दयानंद कवडे साहेब,रतिलाल भूसे साहेब, केंद्र प्रमुख इंद्रशेन पवार यांचे



मार्ग दर्शन लाभले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीशैल खानापूर सर व कल्याणी करडे सर यांनी केली, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिपाली धुत्तरगी मॅडम, गुरूदेवी आलमेल मॅडम,आश्र्विनी हिटनळ्ळी मॅडम,सुरेखा मिसे मॅडम, सुजाता बनसोडे, भिमाबाई बनसोडे, कविता भाविकट्टी यांची विशेष योगदान लाभले. महांतेश्र्वर-भवानी तरूण मंडळ,बसवेश्र्वर तरूण मंडळ,सिध्दार्थ तरुण मंडळ, गणेश तरुण मंडळ यांचे अनमोल सहकार्य लागले,शेवटी मुख्याध्यापक अशोक पोमाजी यांनी सर्वांचे आभार मानले.